# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्रमांक - ३७०/२०२४ दिनांक ०४/१०/२०२४

## प्रेस नोट

**“ शिवकृपा फास्ट फुड ॲण्ड ज्युस सेंटर समोर ब्रिज खाली नालासोपारा पुर्व ता.वसई जि.पालघर येथे एक बांग्लादेशी महीलेवर कारवाई करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांना यश.!! ”**

शिवकृपा फास्ट फुड ॲण्ड ज्युस सेंटर समोर ब्रिज खाली नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर या परीसरामध्ये परदेशी नागरीक अनधिकृतपणे वास्तव्य करीत असलेबाबत माहीती अनैतीक मानवी वाहतुक शाखेचे पोलीस निरीक्षक सौरभी पवार मॅडम यांना मिळाल्यावरुन पोलीस पथक, व दोन पंच असे सदर ठिकाणी जावुन दि. ०३/१०/२०२४ रोजी कारवाई करुन एक बांग्लादेशी महीलेस अटक करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षास यश आलेले आहे.

सदर बाबत थोडक्यात हकीकत अशी कि, सदर परीसरामध्ये अनधिकृतपणे वास्तव करुन काम करीत असलेले परदेशी नागरीक यांचे मिळालेल्या माहीतीच्या आधारे सदर ठिकाणी जावुन पाहीले असता एक संशयीत महीला मिळुन आल्याने तीस तीचे नाव पत्ता विचारले असता तीने तीचे नाव **सिमा रफिक खान वय ४० वर्ष रा. रुम नं १०२ डायमंड प्लस नगीनदास मच्छिमार्केट जवळ नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर मुळ रा.ग्राम-शिरेमनी तह-खुलना बांग्लादेश** असे सांगितले असुन तीचेकडे तीचे भारतीय नागरीक असल्याबाबतचे कागदपत्र विचारले असता तीने भारतीय नागरीकत्वांचे कागदपत्र सादर केले नसुन ती काही वर्षापुर्वी तिच्या पतीसह कामानिमित्त बांग्लादेश मधुन कलकत्ता व तेथुन मुंबई येथे विना तिकीट प्रवास करुन ट्रेनने आले असुन तीचा पती रफीक शेख हा तीस नालासोपारा येथे सोडुन पुन्हा बांग्लादेश येथे गेला असल्याचे तीने सांगितले आहे.

तरी सदर बांग्लादेशी महीलेस ताब्यात घेवुन सदर आरोपीत महीलेवर तुळींज पोलीस ठाणे गु.रजि.नं.६९६/२०२४ भारतीय पासपोर्ट अधिनियम १९२० चे कलम ३(अ), ६(अ), सह विदेशी अधिनियम १९४६ चे कलम १४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस उपआयुक्त श्री. अविनाश अंबुरे,पोलीस उप आयुक्त सो (गुन्हे), सहायक पोलीस आयुक्त श्री. मदन बल्लाळ (गुन्हे शाखा), यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पोनि/सौरभी पवार तसेच मपोहवा/०५००४ डोईफोडे, पोहवा/०७०५५ शेटये, चालक पोहवा/०७०६६ पागी, सर्व नेम. अनै. मा. वा. प्र. कक्ष नालासोपारा यांनी उत्कृष्ठरित्या पार पाडली आहे.

-----ooo-----